# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

गुलटेकडी, पुणे ४११ ०३७

## शिक्षकेतर पदांसाठी पात्रता व भरती नियम

| अनु. क्र. | पदनाम | शैक्षणिक / वैयक्तिक अर्हता | वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक कुलसचिव | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही विद्याशाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२) शिक्षणक्षेत्रातील प्रशासन, परीक्षा, आस्थापना विभागात किंवा लगतच्या पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव.<br>३) संगणकाचे उत्तम ज्ञान आवश्यक. | ४५ वर्षे |
| २ | मुख्यलेखापाल | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२) वित्त विभागात लगतच्या पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव.<br>३) संगणकाचे उत्तम ज्ञान आवश्यक. Tally व Costing चे उत्तम ज्ञान आवश्यक. Taxation विषयात प्राविण्य असलेल्या उमेदवारांना विषेश प्राध्यान्य दिले जाईल. | ४५ वर्षे |
| ३ | कार्यालय अधिक्षक | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही विद्याशाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२) शिक्षणक्षेत्रातील प्रशासन, परीक्षा किंवा आस्थापना विभागात लगतच्या पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव.<br>३) संगणकाचे उत्तम ज्ञान आवश्यक. | ४५ वर्षे |
| ४ | लघुलेखक | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही विद्याशाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२) इंग्रजी व मराठी भाषेवर प्रभुत्व.<br>३) स्टेनोग्राफी स्पीड १००/४०<br>४) समान पदावर कामाचा अनुभव असणे आवश्यक. | ४५ वर्षे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ५) शिक्षणक्षेत्रातील प्रशासन विभागात लघुलेखक म्हणून ३ ते ५ वर्षांचा अनुभव असल्यास प्राध्यान्य.<br>६) संगणकाचे उत्तम ज्ञान आवश्यक. | |
| ५ | वरिष्ठ लिपिक | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही विद्याशाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२) लगतच्या पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव.<br>३) संगणकाचे उत्तम ज्ञान आवश्यक. | ४० वर्षे |
| ६ | वित्त लिपिक | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य विद्याशाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२) इंग्रजी व मराठी टंकलेखनाची किमान ३० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण.<br>३) संगणकीय ज्ञान आवश्यक.<br>४) वित्त विभागातील कामाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य. | ४० वर्षे |

- वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर शैक्षणिक अर्हतेची अट अथवा योग्य उमेदवारासाठी वयाची अट शिथिल करण्याचा अधिकार व्यवस्थापन मंडळास आहे.

- वरिष्ठ लिपिक या पदासाठी उमेदवाराची नेमणूक पदोन्नतीने होत असेल तर त्यासाठी वयाची अट रहाणार नाही.

## भरती नियम

१) वरील शिक्षकेतर पदांसाठी दोन अग्रगण्य राज्य वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात येईल.

२) सदर पदांसाठीचे अर्ज स्विकारण्याच्या तारखेच्या १५ दिवस आधी सदर जाहिरात प्रसिद्ध केली जाईल. सदर जाहिरातीस अत्यल्प प्रतिसाद मिळाल्यास ठराविक कालावधीनंतर तीच जाहिरात पुन:प्रकाशित केली जाईल.

३) भरती प्रक्रियेचे वेळापत्रक, जाहिरात, पात्र व अपात्र उमेदवारांची नावे, मुलाखतींचे वेळापत्रक ई. सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध केली जाईल.

४) विद्यापीठाने नियुक्ती केलेल्या छाननी समितीद्वारे सर्व अर्जांची छाननी केली जाईल.

५) विद्यापीठाद्वारे निवड समिती नियुक्त केली जाईल. निवड समितीची रचना खालीलप्रमाणे असेल :

- कुलसचिव (अध्यक्ष )
- व्यवस्थापन मंडळ नामनिर्देशित सदस्य
- विद्यापीठ न्यासाचा नामनिर्देशित सदस्य
- प्रशासन विषयातील तज्ञ
- मागासवर्गीय जागांसाठी प्रतिनिधी (गरजेप्रमाणे)

६) टपालखात्याद्वारे पत्र मिळण्यास उशीर होऊ शकतो ही शक्यता लक्षात घेउन मुलाखतीस उपस्थित रहाण्याविषयीची माहिती पात्र उमेदवारांना ईमेल, दूरध्वनी व संकेतस्थळाद्वारे मुलाखतीच्या तारखेच्या १५ दिवस आधी कळविण्यात येईल.

७) निवड समितीचा अहवाल व्यवस्थापन मंडळास, त्यांच्या निर्णयासाठी सादर करण्यात येईल.

८) निवड झालेल्या उमेदवारांना सचिव / कुलसचिव यांच्याद्वारे नेमणूक पत्रे देण्यात येतील.

* * * * *